दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ४ थे अंक ४१ वा शुक्रवार दि.१२ जुलैं २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# ओबीसींसाठी आता वंचित मैदानात

छत्रपती संभाजीनगर : सगेसोय-याचे राजकारण आणि मराठा आरक्षणामुळे ओबीसींमध्ये अस्वस्थता पसरली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभरात 'ओबीसी आरक्षण बचाव संवाद यात्रा' काढून ओबीसींच्या मनातील भीती दूर करण्याचे प्रयत्न करा, असे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी दोन दिवसांपूर्वी जिल्ह्यातील पदाधिका-यांना निर्देश दिले होते. त्यानुसार वंचितच्या पदाधिका-यांनी संवाद यात्रेचे नियोजन सुरू केले आहे. दोन दिवसांपूर्वी प्रकाश आंबेडकर शहरात आले होते. त्यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश बन आणि प्रभाकर बकले यांच्यासह अन्य पदाधिका-यांना सूचना केल्या की, राजकीय व अराजकीय ओबीसींच्या सामाजिक संघटनांना सोबत घेऊन संपूर्ण जिल्ह्यात 'ओबीसी आरक्षण बचाव संवाद यात्रा' काढावी. त्यात ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लावता गरीब मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण द्यावे, सगेसोय-याची अंमलबजावणी रद्द करावी, या मागण्या घेऊन जिल्ह्यातील १२४ पंचायतीस्तरावर सभा-मेळावे घ्यावेत. या माध्यमातून मराठा आरक्षणामुळे ओबीसीमध्ये पसरलेली अस्वस्थता दूर करावी. हा उपक्रम संपूर्ण राज्यभरात राबविला जाणार आहे.

यासंदर्भात योगेश बन यांनी सांगितले की, १५ जुलैपर्यंत जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षातील ओबीसींचे नेते, सामाजिक संघटनांच्या पदाधिका-यांसोबत संवाद साधून साधारणपणे १८ ते २० जुलैपर्यंत या संवाद यात्रेला सुरुवात केली जाईल. यापैकी ६४ पंचायत समित्या माझ्याकडे, तर ६० पंचायत समित्यांची जबाबदारी बकले यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. याप्रसंगी अमित भुईगळ, मराठवाडा सचिव तथा राज्य प्रवक्ते तय्यब जफर, मराठवाडा संघटक महेश निनाळे, मिलिंद बोर्डे, मनपा विरोधी पक्षनेता अफसर खान, पंकज बनसोडे, जलीस अहमद, रामदास वाघमारे, रूपचंद गाडेकर, प्रवीण जाधव, रवी रत्नपारखे, शाहीर मेघानंद जाधव, रोहन गवई, पंडितराव तुपे,



अंजन साळवे, वैशाली राणेकर यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीचा कानोसा या बैठकीत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. आंबेडकर यांनी ओबीसी आणि मराठा समाजात सुरू असलेल्या आरक्षणाच्या मुद्यावर मार्गदर्शन केले. जिल्ह्यातील पदाधिकारी-कार्यकर्त्यांसोबत होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा केली. याशिवाय, जिल्ह्यातील सर्वच ९ विधानसभा मतदारसंघांतील परिस्थितीचा आढावा घेतला.

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची १९ जुलैला मुंबईत बैठक

नागपूर : लोकसभेच्या निकालानंतर प्रदेश काँग्रेसने विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. १९ जुलै रोजी मुंबईतील टिळक भवनात राज्यभरातील शहर व जिल्हाध्यक्षांसह प्रदेश पदाधिका-यांची महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली असून तीत विधानसभा निवडणुकीची रणनिती आखली जाणार आहे. विशेष म्हणजे राज्यभरातून मागविण्यात आलेल्या इच्छुक उमेदवारांच्या अर्जांचाही आढावा घेतला जाणार आहे. ही बैठक १२ जुलै रोजी आयोजित करण्यात आली होती. मात्र, त्या दिवशी विधान परिषदेची



निवडणूक असल्याने एक आठवडा पुढे ढकलण्यात आली. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होईल. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधानसभेतील गटनेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील, कार्याध्यक्ष शिवाजीराव मोघे, आरिफ नसीम खान, चंद्रकांत हंडोरे, खा. प्रणिती शिंदे, कुणाल पाटील उपस्थित राहतील. या बैठकीला जिल्हा प्रभारी व विविध आघाडी व सेलच्या प्रमुखांनाही निमंत्रित करण्यात आले आहे, असे प्रदेश उपाध्यक्ष (प्रशासन व संघटन) नाना गावंडे यांनी कळविले आहे. प्रदेश काँग्रेसने इच्छुक उमेदवारांकडून १० ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज मागविले होते. संबंधित अर्जांचा अहवालही शहर व जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षांकडून प्रदेश काँग्रेसला सादर केला जाईल. आलेले व पुढील प्रक्रियेवरही बैठकीत चर्चा होऊन धोरण ठरविले जाईल. या बैठकीत मतदार नोंदणीबाबतचा आढावा तसेच संघटनात्मक आढावा देखील घेतला जाणार आहे. ज्या शहर व जिल्ह्यातील पक्षाची महत्वाची पदे रिक्त आहेत तेथे नियुक्ती करण्यावरही चर्चा होईल. या बैठकीत संघटनात्मक आढावा घेतला जाईल. विधानसभा निवडणुकीच्या तयारीच्या दृष्टीने ही बैठक महत्वाची मानली जात आहे.

## वसतिगृहांची अनुदाने मिळत नाहीत ही शोकांतिका

सातारा : सर्वसामान्यांच्या प्रश्नांबाबत राज्यकर्त्यांकडे आस्था नाही. राज्यात गोरगरिबांच्या मुलांसाठी सुरू करण्यात आलेल्या शिक्षण संस्था व वसतिगृहांची अनुदाने मिळत नाहीत ही पुरोगामी महाराष्ट्रातील शोकांतिका असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी व्यक्त केले. भारतीय भटके व विमुक्त विकास व संशोधन संस्थेच्या वतीने पुढे आंबेडकर साहित्य पंचायतीच्या वतीने देण्यात येणारा फुले आंबेडकर साहित्य पुरस्कार वितरण कार्यक्रमात पवार बोलत होते. यावेळी माजी खासदार श्रीनिवास पाटील, संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण माने, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुनील माने, भाई शैलेंद्र माने, यशवंत माने, प्रा. जीवन बोराटे, डॉ. समता जीवन, मिंच्छद्रनाथ जाधव, शशी माने, हरिदास जाधव, नारायण जावलीकर, सुलोचना माने, कादंबरी माने यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पवार म्हणाले, मागील काही दिवसांमध्ये अनुदान थकीत ठेवण्याची मानसिकता राज्यकर्त्यांची वाढली आहे. एकीकडे मोफत योजनांचे गाजर दाखवून मतांचे राजकारण करताना दुसरीकडे गोरगरीब आणि सामान्य यांच्यावर अन्याय होत आहे. राज्यातील गोरगरिबांच्या मुलांसाठी शिक्षण संस्था, वसतिगृहांची अनुदाने मिळत नसल्यामुळे संस्थाचालकांची अडचण होत आहे.

# भंगार झाली लातूरची लालपरी

लातूर : प्रतिनिधी-सुरक्षीत प्रवास आणि एसटीच्या वेगवेगळ्या सवलती, लांब पल्ल्यांसाठी सुरु असलेल्या गाड्या यामुळे प्रवासीवर्ग मोठ्या प्रमाणात एसटीकडे वळल्याचे चित्र आहे. असे असले तरी, लातूर विभागात खिळखिळ्या अन् भंगार बसेसवरच एसटी हाऊसफुल्ल आहे. लालपरी अशी बिरुदावली मिरविणा-या एसटी बसेस भंगार झाल्या आहेत. सध्या पावसाळा सूरु आहे. अनेक बसेस गळक्या आहेत. काही बसेसला चिकट पट्ट्या लावून गळती बंद करण्यात आली असली तरी प्रवाशांच्या अडचणी मात्र सुटता सुटत नाहीत, अशी परिस्थिती आहे.




लातूर विभागात पहाटे ५ वाजल्यापासून प्रवासी सेवा सुरु होते. ग्रामीण भागातील दैनंदिन फे-या, तसेच लांबपल्ल्यांच्या बसेसमधून क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी प्रवास करीत असल्याने चालक-वाहकांना नाकीनऊ येत आहे. एका बसची प्रवासी क्षमता ५५ असताना सध्या बहुतांशी बसमधून शंभरच्या वर प्रवासी प्रवास करीत आहेत. त्यामूळे वाहनकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी असल्याने बस थांबविली नाही, तर प्रवासी वादावादीवर येत असल्याचे चालक व वाहकांची डोकेदुखी वाढली आहे. खासगी वाहतूकीच्या स्पर्धेत एसटी उतरली असली तरी बसगाड्यांची अवस्था मात्र दयनीय आहे. त्यामुळे प्रवाशांचा भार वाहताना चालकांची दमछाक सुरु आहे. गाड्यांची दुरवस्था झालेली असतानाही प्रवाशांची गर्दी बघता गाड्यांची देखभाल करण्यासही लातूर विभागाला वेळ मिळत नाही. एकीकडे एसटीची चाके थांबत नसल्याने दुवस्था झालेल्या बसमधून प्रवाशांना नाईलाजाने प्रवास करावा लागत आहे.

# मृत महिलेच्या कुटुंबीयांना १० लाखांची मदत जाहीर

मुंबई : पुण्यातील पोर्शे कारचे हिट अँड रन प्रकरण अजूनही ताजे असतानाच, रविवारी पहाटे मुंबईतील वरळी भागात असाच एक दुर्दैवी प्रकार घडला. २४ वर्षीय मिहीर शाह याने मद्यधुंद अवस्थेत कार चालवून नाखवा दाम्पत्याच्या दुचाकीला धडक दिल्याचा आरोप आहे. या दुर्घटनेत दुचाकीवरील महिला कावेरी नाखवा यांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या कावेरी नाखवा यांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून १० लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. या प्रकरणात नाखवा




कुटुंबाचे झालेले नुकसान कधीही भरून येणारे नाही, पण मानवतेच्या दृष्टीकोनातून ही मदत जाहीर केली आहे अशा भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केल्या. मुंबई सागरी किनारा प्रकल्पाची पाहणी केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही घोषणा केली. वरळी हिट अँड रन प्रकरणातील मुख्य आरोपी मिहीर शाह याला तब्बल ६० तासांनंतर मंगळवारी शाहपूरमधून अटक करण्यात आली. अपघातानंतर त्याने आपली कार वांद्रे, कलानगर परिसरात सोडली होती आणि वडील राजेश यांना फोन करून घटनाक्रम सांगितला होता.

# दादर रेल्वे स्थानकाचे नाव बदलून चैत्यभूमी करा - डॉ. नितीन राऊत

### अधिवेशनातच प्रस्ताव मंजूर केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याची मागणी

मुंबई / प्रतिनिधी :- राज्य सरकारने मुंबईतील अनेक रेल्वे स्थानकाचे नावे बदलविण्याची विनंती केंद्र सरकारकडे केली आहे. त्याच धर्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कोट्यवधी अनुयायांच्या मागणीनुसार दादर स्थानकाचं नामांतर 'चैत्यभूमी' करावे व यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याची मागणी काँग्रेसचे जेष्ठ नेते व राज्याचे माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी आज सभागृहात केली.

२०१८ मध्ये राज्य सरकारने एल्फिन्स्टन रोड स्थानकाचं नाव बदलून प्रभादेवी केलं. ओशिवारा येथे रेल्वे स्थानक बनत असतानाच त्याला राम मंदिर असं नाव दिलं. दादर स्थानकाचं नाव बदलून चैत्यभूमी करावं, ही भीमसैनिकांची मागणी खूप जुनी आहे. त्यामुळे राज्य सरकारने जनभावनेचा आदर करत आता दादरचं नाव चैत्यभूमी करावं, अशी आग्रही मागणी डॉ. राऊत यांनी आज सभागृहात केली.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यात दादरला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दादरलाच राजगृहात ते राहायचे आणि महापरिनिर्वाणानंतर बाबासाहेबांचे अंतिम विधी येथेच झाले. त्यामुळे राज्यातल्याच नाही, तर देशातल्या आणि जगातल्या भीम अनुयायांच्या भावना दादरशी जोडल्या गेल्या आहेत. दरवर्षी लाखोंच्या संख्येने भीम अनुयायी महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमीवर येतात. त्यामुळे त्यांच्या भावनांचा आदर करत या अधिवेशनातच राज्य सरकारने असा प्रस्ताव मंजूर करावा अशी मागणी यावेळी डॉ. राऊत यांनी राज्य शासनाला केली.

# राखीपौर्णिमेलाच लाडक्या बहिणांना पंधराशेची भेट

पुणे : लाडकी बहीण योजनेला लाभ येत्या राखीपौर्णिमेपासूनच सुरू होईल. राज्यातील दीड कोटी महिलांच्या खात्यात त्यादिवशी प्रत्येकी पंधराशे रुपये जमा होतील, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी सांगितले. या योजनेमुळे राज्य आर्थिक संकटात जाईल, या विरोधकांच्या आरोपाला काहीही अर्थ नाही, असा दावाही पाटील यांनी केला. राज्यातील अटीच कोटी महिलांना या योजनेचा लाभ होईल असे ते म्हणाले.

योजनेची माहिती देण्यासाठी पक्षाच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत पाटील यांनी विरोधक कसलीही माहिती न घेता बोलतात, अशी टीका केली. शहराध्यक्ष दीपक मानकर, कार्याध्यक्ष प्रदीप देशमुख, वैशाली नागवडे तसेच पक्षाचे अन्य स्थानिक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. पाटील म्हणाले, ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या वक्तव्यावर बोलण्याइतका मी मोठा नाही, मात्र अजित पवार यांनी या योजनेसाठी आर्थिक तरतूद करण्यापूर्वी ते बोलले आहेत हे लक्षात घ्यायला हवे. राज्याने कर्ज काढण्याची मर्यादा अजून पार केलेली नाही. अर्थसंकल्पात महिला, शेतकरी, तरुण, विद्यार्थी, अल्पसंख्याक अशा विविध घटकांसाठी योजना जाहीर केल्या आहेत. विरोधी पक्षाच्या नेत्यांकडे लाडकी



बहीण योजनेचे अर्ज देऊ नका, असे कोणी सत्ताधारी नेते म्हणत असतील तर ते चुकीचे आहे. माता भगिनींना लाभ मिळणे गरजेचे आहे. मग तो कोणाच्यामार्फत मिळाला, तरी काही हरकत नाही, असे पाटील म्हणाले.

## संपादकीय....

# पुतीन-मोदी आलिंगन

भारत आणि रशियाची सात दशकांची मैत्री आहे. पूर्वी रशिया हा सोव्हिएत संघराज्याचा भाग होता. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर हे संघराज्य विस्कटले आणि त्यातून अनेक छोटे देश निर्माण झाले. शीतयुद्ध काळात सोव्हिएत रशिया हा भारताला संरक्षण सामग्री पुरवणारा प्रमुख देश होता. त्या काळी भारत मुख्यतः ही सामग्री विकत घेत असे; परंतु नंतरच्या टप्प्यात संशोधन आणि विकास, संयुक्त उत्पादन या प्रकारचे सहकार्याचे संबंध उभय देशांत निर्माण झाले. आज भारताला रशियाची जशी गरज आहे, तशी रशियालाही भारताची आहे. आता भारत आणि रशिया संबंध अधिक सुदृढ झाल्यास त्याचा दोन्ही देशांच्या जनतेला मोठ्या प्रमाणात फायदा होईल, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. प्रादेशिक शांतता आणि स्थैर्यासाठी भारताला पूरक भूमिका बजावायची आहे, हे त्यांनी स्पष्ट केले आहे. गेल्या १० वर्षांत मोदी यांनी ही भूमिका उत्तम प्रकारे बजावली आहे. त्यांना रशियाच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांच्या हस्ते गौरविण्यात आले, यातून उभय देशांतील हे दृढ संबंध लक्षात येतात. रशियाच्या सैन्यामध्ये सहायक कर्मचारी म्हणून काम करणार्या सर्व भारतीयांची सुटका करण्याचे आणि त्यांचे प्रत्यार्पण करण्याचेही रशियाने मान्य केले. भारत-रशियादरम्यान व्यापार, हवामान, संशोधन अशा विविध क्षेत्रांशी संबंधित नऊ सामंजस्य करार मोदी यांच्या या वेळच्या दौर्यात झाले. भारतात छोटी अणुऊर्जा केंद्रे उभारण्यासाठी सहकार्य करण्याची तयारीही रशियाने दाखवली. मोदी यांचा हा दौरा सुरू असताना, रशियाने युक्रेनमधील कीव्ह येथील बालकांच्या इस्पितळावर क्षेपणास्त्रे डागली. त्याच दिवशी जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीच्या नेत्याने मॉस्कोमध्ये सर्वात मोठ्या गुन्हेगाराला मिठी मारणे, हे धक्कादायक असल्याची तीव- भावना झेलेन्स्की यांनी व्यक्त केली. वास्तविक गेल्याच महिन्यात इटलीमध्ये जी-७ ची शिखर परिषद भरली होती, त्यावेळी मोदी आणि झेलेन्स्की यांची भेट झाली होती. तिसर्यांदा पंतप्रधानपदी निवड झाल्याबद्दल त्यांनी मोदी यांचे अभिनंदनही केले होते आणि जागतिक राजकारणात भारताच्या भूमिकेस महत्त्व असल्याचे मत नोंदवले होते. युक्रेनमधील संघर्ष वाटाघाटींद्वारेच सुटू शकतो, असे मोदी यांनी झेलेन्स्की यांना सांगितले होते. तसेच सप्टेंबर २०२२ मध्ये उझबेकिस्तान येथील समरकंदमध्ये झालेल्या भेटीत 'हा काळ युद्धाचा नाही' म्हणून युक्रेनबरोबरचा संघर्ष थांबवा, असे आवाहन मोदी यांनी पुतीन यांना केले होते. एवढे सगळे असूनही केवळ मोदी यांनी पुतीन यांना आलिंगन दिले म्हणून झेलेन्स्की यांनी संताप व्यक्त केला आहे; मात्र त्याची पार्श्वभूमी लक्षात घ्यावी लागेल. रशिया आणि युक्रेन दरम्यानचा प्रश्न युद्धभूमीवर सुटू शकणार नाही, असे मोदी यांनी पुतीन यांना ठणकावून सांगितले आहे. शिखर परिषदेअखेरीस प्रसिद्ध केलेल्या संयुक्त निवेदनातही चर्चा व मुत्सद्देगिरीद्वारे युक्रेन संघर्षाचे शांततापूर्ण निवारण करण्यावर सहमती दर्शवली आहे व त्यासाठी आवश्यक ते सहकार्य आणि मदत करण्याची तयारी भारताने दर्शवली आहे. थोडक्यात, रशियाने युक्रेनवर केलेल्या सातत्यपूर्ण हल्ल्यांचा मोदी यांनी एकप्रकारे निषेधच केला आहे; परंतु या पलीकडे जाऊन पुतीन यांच्याशी भारताने कोणताही संबंध ठेवू नयेत ही झेलेन्स्की यांची अपेक्षाच मुळी चुकीची आहे. कारण, केवळ युक्रेनच्या चष्म्यातून भारताने रशियाकडे का पाहावे? रशियाने युक्रेनवर आक्रमण केल्यानंतरही युरोपीय देशांनी रशियाबरोबरचे संबंध संपूर्णपणे तोडले नाहीत, कारण इंधनासाठी त्यांना रशियाची गरज होती व आहे. पाकिस्तान भारतात दहशतवादी हल्ले करत होता, तेव्हा अमेरिकेनेही पाकिस्तानवर बहिष्कार टाकला नव्हता. चीनने भारतात घुसखोरी केली, त्यावेळी युक्रेनने चीनवर बहिष्कार टाकला होता का? त्यामुळे झेलेन्स्की यांनी भारताविषयी बोलताना संयम सोडता कामा नये. पुतीन यांनी अनेक विरोधकांना नेस्तनाबूत केले असून, ते स्वतः एक हुकूमशहाच आहेत; परंतु तरीही आज ते रशियाचे राष्ट्राध्यक्ष आहेत आणि व्यक्तीपेक्षा रशियाशी मैत्री भारताच्या दृष्टीने फायद्याची आहे. गेल्या पंचवीस वर्षांत भारताने रशियाखेरीज अमेरिका, फ्रान्स, इस्रायलकडूनही संरक्षण साहित्य खरेदी केले; परंतु त्याचवेळी नियंत्रणरेषेलगत चिनी सैन्याशी भारतीय सैनिकांच्या चकमकी होत असताना, भारताला रशियाची नक्कीच गरज आहे. भारताला जे लष्करी तंत्रज्ञान दिले आहे, ते अन्य कोणत्याही देशाला हस्तांतरित करणार नाही, याची हमी पुतीन यांनी यापूर्वीच भारतास दिली आहे; परंतु रशिया चीनला जे लष्करी साहित्य व तंत्रज्ञान देत आहे, त्यावर भारताने बारीक लक्ष ठेवले पाहिजे. केवळ पुतीन यांच्या शब्दावर विश्वास ठेवता येणार नाही, असे मत भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाचे अध्यक्ष पी. एस. राघवन यांनी नोंदवले आहे. तेव्हा या मताची दखल घेऊन भारत सरकारने सतर्क राहण्याची गरज आहे. युक्रेन-रशिया युद्ध सुरू झाल्यापासून भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आयात करत आहे. हे तुलनेने स्वस्तातील इंधन मिळाले नसते, तर त्याचा फटका भारतीय ग्राहकांना नक्कीच बसला असता. या युद्धापूर्वी भारत-रशिया व्यापार २०२५ पर्यंत ३० अब्ज डॉलर इतका असेल, असा अंदाज होता. प्रत्यक्षात २०२३-२४ मध्येच उभय देशांतील व्यापाराचा आकडा ६५ अब्ज डॉलरवर गेला आहे. रशियातून पेट्रोलियम उत्पादनांबरोबरच खते, खनिजे, धातू आणि वनस्पती तेल भारत आयात करतो.

# भ्रमाचा भोपळा फुटलाय, हे सत्य स्वीकारा

विरोधी पक्ष नेता म्हणून काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी लोकसभेत केलेले पहिलेच भाषण इतके मुद्देसूद होते की त्यांचे मुद्दे खोडायला स्वतः पंतप्रधानांना, गृह आणि संरक्षण मंत्र्यांना उभे राहून खुलासे करावे लागत होते. गेल्या दहा वर्षात भाजपचे वरिष्ठ नेते इतके हतबल झालेले कधीच पाहायला मिळाले नव्हते.

राहुल गांधी यांनी ९० मिनिटांच्या भाषणाला संविधानाची प्रत दाखवून सुरुवात केली. आपल्या भाषणात त्यांनी भाजप हिंसा पसरवत आहे, असे म्हटले. हिंदुत्व हा काही एकट्या भाजपचा ठेका नाही, असेही ठणकावून सांगितले. त्यांनी अल्पसंख्याक, पेपरलिक वाद आणि अग्निपथ योजना या मुद्द्यांवरून केंद्र सरकारवर निशाणा साधला. हिंदुत्व, अग्निवीर, शेतकरी, मणिपूर, एनईईटी, बेरोजगारी, नोटाबंदी, जीएसटी, एमएसपी, हिंसाचार, भीती, धर्म, अयोध्या, गुजरात, जम्मू-काश्मीर, लडाख, अदानी-अंबानी, पंतप्रधान, भाजपचा भ्रष्टाचार या मुद्द्यांवर टीका केली.राजकीय आर्थिक आणि कॉर्पोरेट घोटाळ्यांची यादी चाळली तर सर्वाधिक घोटाळे हे मोदी शहा यांच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात झाल्याचे निदर्शनास येते. त्यातील एक आहे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ घोटाळा. जीव्हीके आणि भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांवर फसवणूक आणि खोटेपणा केल्याबद्दल एफआयआर नोंदवण्यात आले. जीव्हीकेला पाच हजार कोटी रुपये देण्यासाठी प्रकल्पाला तीन वर्षे जाणीवपूर्वक उशीर करण्यात आला. नंतर जीव्हीकेकडील बहुतांश एअरपोर्ट अदानींना हस्तांतरित करण्यात आले. याशिवाय ओडिशा औद्योगिक-जमीन गहाण घोटाळा (५२ हजार कोटी रुपये), मध्य प्रदेशातील व्यापम घोटाळा, मध्य प्रदेशचे शेतकरी कल्याण आणि कृषी विकास मंत्री गौरी शंकर चतुर्भुज बिसेन बेहिशेबी मालमत्ता प्रकरण (दोन हजार कोटी रुपये), हरी कुमार झा बेहिशोबी मालमत्ता प्रकरण (१५ कोटी रुपये), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (एनसीपी) बेहिशेबी-रोख प्रकरण (३४ कोटी रुपये), हरियाणा नागरी विकास प्राधिकरण विवेकाधीन कोटा भूखंड घोटाळा, ज्योतिरादित्य माधवराव सिंधिया जमीन हडप प्रकरण, आर. सी. कुरीएल विषम मालमत्ता प्रकरण (मध्य प्रदेश), मयंक जैन बेहिशोबी मालमत्ता प्रकरण, राजस्थान गृहनिर्माण मंडळ मालमत्तेचे अनियंत्रित भाडेपट्टी वाटप, - बेकायदेशीर जमीन वाटप घोटाळा, भारतीय रेल्वे मोबाइल घोटाळा, हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड आणि रोल्स-रॉईस संरक्षण घोटाळा (दहा हजार कोटी रुपये), एअर इंडिया फॅमिली फेअर स्कीम घोटाळा, बोकारो स्टील प्लान्ट भरती घोटाळा, गुजरातचा जमीन वाटप घोटाळा, कृभको आणि यारा आंतरराष्ट्रीय खत फसवणूक वाद, दिल्ली जल बोर्ड घोटाळा (दहा हजार कोटी रुपये), भारतीय रेल्वे 'इमर्जन्सी कोटा' तिकीट घोटाळा, स्मशान शेड घोटाळा इत्यादी घोटाळे भाजपच्या काळात झाले आहेत. २०१५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाला असे आढळून आले की केंद्र सरकारने तरतूद केलेली असताना गृहनिर्माण आणि शहरी गरिबी निर्मूलन मंत्रालयाच्या राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियानाने नऊ लाख बेघर लोकांसाठी केवळ २०८ घरे बांधली होती. दिल्ली जल बोर्ड टँकर घोटाळा (४०० कोटी रुपये) - दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री शीला दीक्षित यांच्यावर महागड्या निविदा काढल्याचा आरोप होता. दिल्ली सरकारच्या लाचलुचपत प्रतिबंधक शाखेने दीक्षित आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याविरोधात एफआयआर दाखल केला आहे. अमेठी राजीव गांधी चॅरिटेबल ट्रस्ट जमीन हडप प्रकरण - एका महसूल न्यायालयाने राजीव गांधी चॅरिटेबल ट्रस्टला एका औद्योगिक घराने विकलेली जमीन उत्तर प्रदेश राज्य औद्योगिक विकास महामंडळाला परत करण्याचे आदेश दिले. दिल्ली सीएनजी घोटाळा (१०० कोटी रुपये) - दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री शीला दीक्षित आणि नायब राज्यपाल नजीब जंग या घोटाळ्यात आरोपी होते. दिल्ली वीज घोटाळा - कॅगने अहवाल दिला की रिलायन्स अनिल धीरूभाई अंबानी समूहाची उपकंपनी बीआरपीएलनेने त्यांचे दर जवळजवळ आठ हजार कोटी रुपयांनी वाढवल्याचा आरोप आहे. गुजरात मासेमारी घोटाळा (४०० कोटी रुपये) - गुजरातचे मंत्री पुरुषोत्तम सोलंकी आणि दिलीपभाई संघानी यांच्यावर ५८ जलाशयांसाठी बेकायदेशीरपणे मासेमारीचे कंत्राट दिल्याचा आरोप होता.महाराष्ट्र अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ घोटाळा (१४१ कोटी रुपये) - आमदार रमेश कदम यांना सीआयडीने राज्य संचालित एएसडीसीकडून निधी पळवल्याबद्दल अटक केली. उत्तराखंड मद्य-परवाना घोटाळा - उत्तराखंडचे मुख्यमंत्री हरीश रावत आणि त्यांचे सचिव, मोहम्मद शाहीद, दारूविक्रीवर राज्याचे धोरण बदलण्यासाठी १०० कोटी रुपयांच्या लाचेसाठी एका मद्यविक्रेत्याशी वाटाघाटी करताना दिसले. नागपूर जमीन हडप प्रकरण - महाराष्ट्राच्या उच्च न्यायालयाने खासदार विजय जे. दर्डा आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आणि विजय आणि राजेंद्र दर्डा यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या जवाहरलाल दर्डा एज्युकेशन सोसायटीच्या अतिक्रमणाच्या चौकशीचे आदेश दिले.

एकात्मिक बाल विकास सेवा 'चिक्की' वाद (२०६ कोटी रुपये) - महाराष्ट्राच्या महिला आणि बालकल्याण मंत्री पंकजा मुंडे यांनी विक्रेत्यांना कंत्राट देताना अनिवार्य ई-निविदा मागितल्या नाहीत. बेंगळुरू बेकायदेशीर जमीन अ-सूचना घोटाळा, कर्नाटकचे मुख्यमंत्री बीएस येडियुरप्पा हे प्रमुख संशयित होते. वीरभद्र सिंग बेहिशेबी मालमत्ता प्रकरण (सहा कोटी रुपये) सीबीआयने हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री वीरभद्र सिंग यांची प्राथमिक चौकशी नोंदवली. एनटीसी जमीन घोटाळा (७०९ कोटी रुपये) सीबीआयने गुजरातचे माजी मुख्यमंत्री शंकरसिंह वाघेला यांच्यावर गुन्हा दाखल केला. लुईस बर्जर ग्रुप लाच प्रकरण - गोव्याचे माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री चर्चिल आलेमाओ आणि गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत हे प्रमुख संशयित होते. आलेमाओला अटक करण्यात आली आणि कामत यांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला. लुई बर्जर ग्रुपच्या अधिकाऱ्यांनी गोव्याच्या मंत्र्याला लाच दिल्याची कबुली दिल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. पंजाब नॅशनल बँक घोटाळा : ब्रँडी हाऊस, मुंबई येथील पंजाब नॅशनल बँकेच्या शाखेत (१.७७ अब्ज अमेरिकी डॉलर्स) किमतीचे फसवे पत्रजारी करण्यात आले, ज्यामुळे बँकेला या रकमेसाठी जबाबदार धरण्यात आले. नीरव मोदीशी जोडलेले फसवे व्यवहार बँकेच्या एका नवीन कर्मचाऱ्याच्या लक्षात आले. या घोटाळ्यात दोन शाखा कर्मचारी सामील होते, ज्यामध्ये सोसायटी फॉर वर्ल्डवाईड इंटरबँक फायनान्शिअल टेलिकम्युनिकेशनसह इतर भारतीय बँकांच्या (अलाहाबाद बँक, क्सिस बँक आणि युनियन बँक ऑफ इंडियासह) परदेशातील शाखांमध्ये पेमेंट नोट्स जमा करण्यासाठी बँकेच्या कोअर बँकिंग प्रणालीला बायपास करण्यात आले होते. तीन ज्वेलर्सची (गीतांजली ग्रुप आणि त्याच्या उपकंपन्या, गिली आणि नक्षत्र) देखील चौकशी सुरू आहे. मेहुल चोक्सीही या घोटाळ्यात आरोपी आहे. बेल्ली बेलाकू घोटाळा: कर्नाटक सौहार्द सहकारी कायद्याचा गैरवापर करून बंगळुरूमध्ये सुमारे दोन हजार निष्पाप बळींची फसवणूक करण्यात आली. कर्नाटक सरकारने एसआयटी, सीआयडी आणि त्याच्या खटल्याचा तपास कर्नाटक पोलिसांकडे सोपवला. प्रथमदर्शनी अहवाल असे दर्शवितात की या घोटाळ्यात एकत्रित सार्वजनिक निधीतून सुमारे २० कोटींची उधळपट्टी करण्यात आली आहे. गुरू राघवेंद्र बँक घोटाळ्यात अनेक बेली बेलाकू घोटाळ्याचे गुन्हेगार देखील सहआरोपी आहेत. सिरी वैभव घोटाळा : १८ जून २०२२ रोजी कर्नाटक राज्य सौहर्दा फेडरल कोऑपरेटिव्हने गुंतवणुकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी श्रीवैभव सौहर्दा पट्टिना सहकारी नियामिथाच्या बोर्ड सदस्यांविरुद्ध कर्नाटक राज्य पोलिसांकडे फौजदारी तक्रार दाखल केली आहे. प्रथमदर्शनी अहवाल असे सूचित करतात की या घोटाळ्यात सामूहिक सार्वजनिक निधीतून सुमारे ३५० कोटी रुपयांची उधळपट्टी करण्यात आली आहे. गुरू राघवेंद्र बँक घोटाळ्यात अनेक सिरी वैभव घोटाळ्याचे गुन्हेगार देखील सहआरोपी आहेत ज्यात गुन्ह्यांमध्ये गुन्हेगारी संबंध असल्याचे दिसून येते. भाजपच्या दहा वर्षांच्या कालावधीत झालेले घोटाळे पाहता हा कालावधीच खरी असत्याची फॅक्ट्री असल्याचे जाणवत आहे. आम्हाला इतकी टक्के मते मिळाली, आम्ही आता पुढील निवडणुकीत अशी मते घेणार, आणखी यश मिळवणार आदी दावे भाजप करत असला तरी भाजपचा भ्रमाचा भोपळा फुटला आहे सत्य हेच आहे आणि ते त्यांनी लवकरात लवकर स्वीकारावे.



# अजित डोभाल यांना सन्मानाने निवृत्त करण्यासाठी नवे पद?

भारताचे 'अतिरिक्त राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार' हे पद नव्यानेच निर्माण करण्यात आलेले असून राजिंदर खन्ना यांनी या पदाचा कार्यभार नुकताच ( २ जुलैपासून) स्वीकारला आहे, या घडामोडीची चर्चा गेला आठवडाभर कुठे झालेली दिसली नाही. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांचे सहकारी म्हणून जे तिघे 'उप (डेप्युटी) सल्लागार' काम करत होते, त्यांत खन्ना हे २०१८ पासून होते आणि त्याहीआधी ते 'रॉ'चे प्रमुख होते. आता तिघा उप-सल्लागारांचे वरिष्ठ म्हणजे 'अतिरिक्त राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार' आणि त्यांच्या वर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अशी नवी उतरंड झाली आहे. याखेरीज सल्ला देण्यासाठी 'राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळ' आणि 'व्यूहात्मक धोरण गट' (स्ट्रॅटेजिक पॉलिसी ग्रूप) हे असतातच. 'चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ' तसेच हवाईदल, लष्कर आणि नौदलाचे प्रमुख, शिवाय संरक्षण, गृह, परराष्ट्र आणि अन्य खात्यांचे मुख्य सचिव या साऱ्यांनी मंत्र्यांप्रमाणेच 'राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार' यांनाही वेळोवेळी आपल्या कामाची माहिती देत राहाणे आवश्यक असते. आजवरच्या या स्पष्ट रचनेत आता नव्या पदामुळे काय नवे बदल होतील? यातून कोणते नवे प्रश्न उद्भवतील? संबंधित खात्यांच्या मुख्य सचिवांकडून पंतप्रधानाचे प्रधान सचिव माहिती घेतात आणि ते पंतप्रधानांशी बोलतात, अशी पद्धत आजवर होती, ती बदलून आता 'राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार' हेच सचिवांच्या बैठका घेणार का? तसे झाले, तर हद्दीचे वाद निर्माण होण्याचा संभव आहे. पण त्याहीपेक्षा 'अतिरिक्त राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार' या नव्या पदावरील वरिष्ठ नेमके काय करणार, हा प्रश्न अधिक मोठा ठरेल. अर्थातच, हे नवे पद सहा जणांच्या वरचे. पंतप्रधान आणि राष्ट्रीय सुरक्षा उप-सल्लागार यांच्यातील अंतर आता आणखी एका पातळीने वाढणार आहे. मग प्रश्न असा येतो की पंतप्रधान आता फक्त 'राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार' यांच्याशी चर्चा करणार की अशा चर्चेत 'अतिरिक्त राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार' हेही सहभागी असणार? गुप्तवार्ता सेवांचे प्रमुख आता या नव्या पदालाही उत्तरदायी असणार का? त्याहीपेक्षा अनेकांच्या मनातच राहिलेला, अटकळवजा प्रश्न आहे तो, हे पद आताच निर्माण करण्यामागे अजित डोभाल यांना सन्मानाने निवृत्त करण्याचा हेतू आहे का? (२०१४ पासून 'राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार' पदावर असलेले डोभाल पुढील वर्षी ८० वर्षांचे होतील) खन्ना हे २०१८ पासून 'राष्ट्रीय सुरक्षा उप-सल्लागार' असल्याने त्यांच्यासारख्या अनुभवी व्यक्तीला आणखी अवसर मिळावा म्हणून हे पद खास निर्माण करण्यात आले आहे का? पण खन्नाच पुढले 'राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार' असणार की त्यांच्याहीऐवजी दुसऱ्या कुणाला संधी मिळणार? या कशाबद्दलच सध्या स्पष्टता नसल्यामुळे 'नवे पद कशासाठी' हा प्रश्न आणखीच गहिरा होतो. 'राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार' हे पद आपल्या देशात तयार करण्यात आले, त्याला आता पाव शतक लोटले आहे- किंवा असे म्हणू की, अवघ्या २५ वर्षांपूर्वी तेही पद नवेच होते! पण ते पद निर्माण करण्याआधी अनेकदा जाहीरपणे चर्चा झाली होती. व्यूहात्मक विषयांमधले 'गुरू' मानले जाणारे के. सुब्रमण्यम हे तत्कालीन मंत्री के. सी. पंत आणि जसवंत सिंह यांना 'राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार' पदाची रूपरेषा ठरवण्यासाठी मदत करत होते, त्यांनीही २०१० मध्ये 'भारताला राष्ट्रीय सुरक्षा सल्लागाराची गरज आहे का?' या शीर्षकाचा लेख लिहून, पुढल्या वाद-प्रतिवादांना वाट करून दिली होती. अर्थात, त्या लेखातही सुब्रमण्यम यांचा कल राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारपद हवे असाच होता. पण त्यामागे 'विचार करणारे' आणि 'कृती करणारे' यांच्यामध्ये संस्थात्मक फरक हवा असे त्यांना वाटत होते, असे माझे मत आहे. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारपदी २००५ साली जे. एन. दीक्षित यांची नियुक्ती असो वा २०१४ मध्ये डोभाल यांची- त्या नियुक्त्यांआधी, या पदावर कशी व्यक्ती हवी, याचीही चर्चा भरपूर प्रमाणात झालेली होती. या पदावर (गुप्तवार्ता प्रमुखांपेक्षा) परराष्ट्र अथवा पोलीस खात्यांतील महनीय व्यक्ती असावी काय, असा त्या चर्चेचा सूर होता. 'राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार' हे राजनैतिक काम करणार की अभ्यासू सल्ला देणार की त्यांनी प्रत्यक्ष कृतीतच सहभागी असण्याची खरोखर गरज आहे, यावरही भरपूर खल झालेला आहे. या पदावरील ब्रजेश मिश्रा व दीक्षित हे परराष्ट्र व्यवहारांचे जाणकार होते, दीक्षितांच्या निधनानंतरचे एम. के. नारायणन हे 'इंटलिजन्स ब्यूरो'चे माजी प्रमुख होते पण त्यांच्यानंतरचे शिवशंकर मेनन हेही राजनयाचे जाणार होते. यांच्या कार्यकक्षांमध्ये किंवा पदाकडून असलेल्या अपेक्षांमध्ये जेव्हा जेव्हा बदल करण्यात आला, तेव्हा तेव्हा बदल होतानाचा खडखडाट झालेला होता. मोदी यांनी डोभाल यांची नेमणूक या पदावर करताना, त्या पदास कॅबिनेट दर्जा दिला. तर डोभाल यांच्या पहिल्या कार्यकाळातच त्यांनी आपल्या पदाचा व्याप केवळ राष्ट्रीय सुरक्षा व्यवस्थापनापुरता न ठेवता सेनादलांपर्यंत वाढवला. त्याहीनंतर 'संयुक्त सेना प्रमुख' हे नवे पद निर्माण करण्यात आले तेव्हा त्या पदाला 'सचिव दर्जा' आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांचे पद मात्र 'कॅबिनेट दर्जा'चे, अशी विभागणी झाली. ती प्रस्तुत लेखकासह अनेकांच्या मते अन्यायकारक आहे. आजवरचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार हे बदलत्या परिस्थितींना प्रतिसाद देत आले आहेत आणि या पदासाठी नेमकी चिरेबंदी संस्थात्मक व्यवस्था नसणे लाभदायकही ठरते आहे, असाही एक मतप्रवाह आहे. तो नव्या परिस्थितीत आणि विशेषतः 'अतिरिक्त राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार' या पदाच्या निर्मितीबाबत खरा ठरो, अशी आशा करतो.



# सर्दी, खोकला झाल्यावर तुम्हीसुद्धा दूध पिणं टाळता का? तज्ज्ञांकडून जाणून घ्या खरं कारण अन् त्यावरील उपाय

पावसाळा सुरू झाला की, सर्दी, खोकला, ताप येणं सामान्य गोष्ट आहे. सर्दी व खोकला झाला की, बरेच जण दूध पिणे टाळतात. कारण– यामुळे श्लेष्मा (कफ) म्युकस प्रॉडक्शन होतो, असे म्हटले जाते. पण, हे खरं आहे का? हे जाणून घेण्यासाठी दी इंडियन एक्स्प्रेसने तज्ज्ञांशी संवाद साधला.

बंगळुरूमधील स्पर्श हॉस्पिटलच्या सल्लागार व पोषणतज्ज्ञ रेश्मा ए. एम. यांच्या मते, या थिअरीमागचे कारण असे आहे की, दुधाच्या सेवनामुळे तोंडात व घशात एक आवरण पडते; ज्याला श्लेष्मा (कफ) समजले जाऊ शकते. पण, शारदा हॉस्पिटलच्या इंटर्नल मेडिसिनच्या डॉक्टर श्रेय श्रीवास्तव म्हणाल्या की, लॅक्टोज असहिष्णुता किंवा दुधाच्या लर्जीच्या लक्षणांमुळे रक्तसंचय किंवा कफ यासारख्या समस्या उदभवू शकतात. पण, हे श्लेष्माच्या उत्पादनामुळे होत



नाही, असेही त्या पुढे म्हणाल्या आहेत.

नक्की वाचा फरिदाबादच्या अमृता हॉस्पिटलचे डॉक्टर अर्जुन खन्ना यांनी याबाबत स्पष्ट केले की, छातीचे आजार असलेल्या भारतीय रुग्णांमध्ये कफ असल्याचे निदर्शनास येते. केळी, भात, दूध यांसारखे बरेच पदार्थ कफनिर्मितीशी संबंधित आहेत. पण, सध्याच्या काळातील औषधे ही कफ उत्पादनाशी अन्नाचा संबंध जोडण्यास समर्थन देत नाहीत, असे त्यांनी सांगितले. तसेच अमेरिकन कॉलेज ऑफ न्यूट्रिशनच्या जर्नलमध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासातही गाईचे दूध पिणाऱ्या लोकांच्या श्लेष्मा उत्पादनात सोयाआधारित पेय सेवन करणाऱ्यांमध्ये फरक आढळला नाही.

तसेच काहींना वैयक्तिक संवेदनशीलतेमुळे किंवा दुधाबरोबर दुग्धजन्य पदार्थ खाल्ल्यानंतर कफ किंवा श्लेष्मा वाढणे यांसारखी लक्षणे जाणवू शकतात. अर्थात, हे सर्वांसाठी लागू होत नाही. दमा किंवा ब्राँकायटिस यांसारख्या श्वसनविषयक समस्या असलेल्यांच्या घशात दुधाचे काही अंश राहिल्यामुळे अशा लक्षणांमध्ये वाढ होऊ शकते. पण, यामुळे श्लेष्मा उत्पादनात वास्तविक वाढ होत नाही, असे तज्ज्ञ रेश्मा म्हणाल्या आहेत.

जर तुम्हाला श्वसनाशी संबंधित विकारांसह कफाचासुद्धा त्रास होत असेल, तर नियमितपणे औषधे घ्या, बाहेर जाताना फेस मास्क वापरा, भरपूर द्रवपदार्थ प्या आणि स्वतःला हायड्रेट ठेवा. तसेच, जर कफ पिवळा किंवा दुर्गंधी असेल, तर ते तुमच्या छातीत संसर्ग झाल्याचे लक्षण आहे. त्यामुळे तुम्ही त्वरित फुफ्फुस तज्ज्ञांना भेटले पाहिजे, असे डॉक्टर अर्जुन खन्ना बजावून सांगितले. दूध पिण्याने श्वासोच्छ्वास घेण्याच्या स्थितीत वाढ होत नाही किंवा वैज्ञानिक पुराव्यांनुसार कफसुद्धा होत नाही. ज्यांना दूध आणि दुग्धजन्य पदार्थ आवडतात, त्यांनी चिंता न करता, या पदार्थांचे सेवन करावे, असे तज्ज्ञ रेश्मा सांगितले.

# रोज ‘इतकी’ पावले चालल्याने चा धोका अन् वजन होईल झपाट्याने कमी; तज्ज्ञांनी सांगितलेली पद्धत एकदा जाणून घ्या

चालणे ही सुदृढ शरीराची गुरुकिल्ली आहे. चालण्यासारखा दुसरा उत्तम व्यायाम नाही. त्यामुळे इतर कुठला व्यायाम केला नाही तरी चालेल. पण, दिवसातून काही वेळ तरी चालायला हवे, हे प्रत्येकालाच माहीत असते. दिवसभरात भरपूर चालल्याने आपल्या सर्वांगाचा व्यायाम होतो. चालणे हे निरोगी शरीर आणि मनासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. योग्य पद्धतीने चालण्याचा व्यायाम केल्यास आपल्या शरीराची चयापचयाची क्षमताही सुरळीत सुरू राहते. दररोज जितका वेळ आपण चालतो, तितक्या जलद गतीने कॅलरी घटवण्यास मदत मिळते. चालणे हा असा व्यायाम आहे की, जो कोणीही करू शकतो. या व्यायामामध्ये तुमचे संपूर्ण शरीर सक्रिय राहते आणि तुमच्या शरीराचा प्रत्येक भाग वेगाने काम करतो. परंतु, तुम्हाला माहीत आहे का की, व्यक्तीने दररोज किती पावले चालावे? याविषयी मुर्शिदाबाद येथील केअर हॉस्पिटल्सचे डॉ. मोईनुद्दीन यांनी माहिती दिल्याचे वृत्त दी इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्याबाबत जाणून घेऊ



डॉ. मोईनुद्दीन सांगतात की, चालणे हा कमी प्रभावाचा व्यायाम आहे; जो वय किंवा तंदुरुस्तीची पातळी विचारात न घेता, भरपूर फायदे मिळवून देतो. अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या मते, दररोज फक्त ३० मिनिटे मध्यम तीव्रतेचे चालणे आपल्या आरोग्यामध्ये लक्षणीय सुधारणा करू शकते. चालण्याचे फायदे वजन कमी करण्यासाठी चालणे हा अतिशय उत्तम उपाय आहे. कोणत्याही वेळेला कितीही वेगाने चालले तरी ऊर्जा खर्च होते आणि त्यामुळे वजन कमी होते. शरीराचे वजन पायांवर पेलून आपण दिवसभर चालतो. त्यामुळे शरीरातील हाडांची शक्ती वाढते. त्यामुळे हाडे लवकर ठिसूळ होत नाहीत. चालणे स्नायूंची ताकद वाढवण्यास व टिकवून ठेवण्यास मदत करते आणि त्यामुळे तुमची शारीरिक क्षमता वाढते. चालण्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो. रक्तदाब कमी होण्यास मदत होते. वेगाने चालल्यास हृदय आणि श्वसनक्रियेत फायदा होतो. चालण्याने तणावाची पातळी कमी होते आणि तणाव कमी होतो; ज्यामुळे तुम्हाला खूप ताजेतवाने वाटते. चालणे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करून मधुमेहाचे व्यवस्थापन करण्यास मदत करू शकते.

दहा हजार पावले चालणे अनेकदा सुवर्ण मानक मानले जाते; परंतु तुमच्या वयानुसार आदर्शत्वाची ही संख्या बदलू शकते, असे डॉ. मोईनुद्दीन म्हणाले. ६० वर्षांखालील इष्टतम आरोग्यदायी फायद्यांसाठी आणि मृत्यूची जोखीम कमी करण्यासाठी दररोज ८,००० ते १०,००० पावले चालण्याचे लक्ष्य ठेवा. ६० पेक्षा जास्त असलेल्या व्यक्तींनी एकूण आरोग्य आणि शारीरिक मर्यादा लक्षात घेऊन दररोज ६,००० ते ८,००० पायऱ्यांचे लक्ष्य ठेवणे, अशी शिफारस आहे. चालण्याची नवीन दिनचर्या सुरू करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. विशेषत: जर तुमच्याकडे आधीपासून अस्तित्वात असलेली वैद्यकीय परिस्थिती असेल जसे की: हृदयरोग उच्च रक्तदाब संधिवात अलीकडील जखम मधुमेह श्वसनाच्या समस्या बैठी जीवनशैली असलेल्यांसाठी लगेच १०,००० पावले उचलण्याचे उद्दिष्ट कठीण असू शकते. डॉ. मोईनुद्दीन यांनी हळूहळू सुरुवात करणे आणि वास्तववादी ध्येये निश्चित करण्याच्या महत्त्वावर भर दिला. पायऱ्यांच्या छोट्या संख्येने सुरुवात करा आणि तुमची फिटनेस सुधारत असताना हळूहळू अंतर आणि तीव्रता वाढवायची हे लक्षात ठेवा. दैनंदिन चालण्याचे ध्येय ठेवा. तुमच्या शरीराचे ऐका आणि चालण्याची परिवर्तनीय शक्ती अनलॉक करण्यासाठी तुमची क्रियाकलाप पातळी हळूहळू वाढवा, असेही डॉ. मोईनुद्दीन सांगतात.

## वाढत्या मुलांसाठी लैंगिक शिक्षणाबाबत या ४ गोष्टी महत्त्वाच्या

आजही शारीरिक संबंधाप्रती बोलणे टैबू मानले जाते आणि लोक यावर उघडपणे बोलणे टाळतात. तर याबद्दल इंटरनेटवरील बरीच सामग्री वास्तविकतेपासून दूर आहे. त्यामुळे संबंध, समस्या आणि त्यांच्या शरीराची माहिती होण्याऐवजी वाढणारी मुले, किशोरवयीन आणि तरुण गोंधळून जातात. समाजात प्रचलित असलेली वर्ज्यता मोडून काढणे अत्यंत गरजेचे आहे. आजकाल गर्भधारणा, एसटीआय यासारख्या लैंगिक आरोग्याशी संबंधित इतर प्रकरणे अगदी लहान वयात दिसून येत आहेत. यामुळेच एका विशिष्ट वयानंतर पालकांनी लैंगिक आरोग्याशी संबंधित महत्त्वाच्या गोष्टींबद्दल मुलांशी बोलायला सुरुवात केली पाहिजे. टीनएजर मुलांसाठी लैंगिक शिक्षण महत्त्वाचे शारीरिक बदल स्वीकारणे– जसजशी मुले मोठी होतात, विशेषत: जेव्हा ते तारुण्यात येतात तेव्हा शरीरात अनेक बदल होतात. केसांची वाढ होत असल्याने, विशेषत: खाजगी भागात, आणि मुलींमध्ये स्त्राव होत असल्याने, स्वच्छतेबद्दल अधिक जागरूक असणे आवश्यक आहे. लहानपणी पालक स्वच्छतेची काळजी घेत असत, परंतु मुले पौगंडावस्थेत प्रवेश करतात तेव्हा त्यांच्यासाठी त्यांच्या स्वच्छतेशी संबंधित माहिती असणे आवश्यक आहे. योनी आणि पुरुषाचे जननेंद्रिय तसेच जघनाच्या केसांच्या स्वच्छतेचे महत्त्व पालकांना सांगितले पाहिजे. यासोबतच त्यांना पीरियड्सच्या स्वच्छतेबाबत जागरुक करणेही गरजेचे आहे.यौन शोषणापासून बचाव – संबंध एक अत्यंत संवेदनशील बाब आहे. वाढणारी मुले सहसा ठरवू शकत नाहीत की त्यांना कोणीतरी आवडते की त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा काही भाग त्यांना आकर्षित करत आहे. या वयात, हार्मोन्सचा दबाव इतका जास्त असतो की मुले खूप लवकर शारीरिकरित्या एखाद्याकडे आकर्षित होतात. मग ते त्यांचे मित्र असोत, शिक्षक असोत, प्रशिक्षक असोत, ओळखीचे असोत किंवा त्यांच्या आजूबाजूचे कोणीही असोत. भावनिक आणि हार्मोनल ओव्हरलोड त्यांना कोणत्याही चुकीच्या नात्याकडे किंवा व्यक्तीकडे आकर्षित करत नाहीत याची खात्री करण्यासाठी, त्यांच्या पालकांनी त्यांच्याशी गोष्टी शेअर करणे महत्त्वाचे आहे. जेव्हा त्यांना त्यांच्या भावना तुमच्याशी शेअर करण्याची परवानगी असेल तेव्हाच तुम्ही लैंगिक संबंधातील जोखीम आणि सुरक्षिततेचे योग्यरित्या स्पष्टीकरण देऊ शकाल.एसटीआय आणि संक्रमण – मुलांमध्ये लैंगिक समज विकसित होण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे आजकाल एसटीआय सामान्य झाले आहेत आणि अगदी लहान वयातही लोकांवर परिणाम करत आहेत. अशा परिस्थितीत लैंगिक आजारांपासून दूर राहण्यासाठी त्याविषयी माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. तारुण्यानंतर आपल्या मुलांना बद्दल जागरूक करा. त्यांना त्याबद्दल सांगा आणि त्याच्या संभाव्य कारणांबद्दल देखील बोला. मुलांमध्ये माहितीच्या अभावामुळे, ते असुरक्षित लैंगिक संबंध ठेवू शकतात, ज्यामुळे एसटीडीचा धोका वाढतो.

# मासिक पाळीदरम्यान महिलांनी उपवास करावा का? जाणून घ्या तज्ज्ञ काय सांगतात

मासिक पाळीदरम्यान माहिलांच्या शरीरात अनेक बदल होत असतात. या काळात शरीराला कर्बोदकांची आवश्यकता असताना महिलांनी उपवास केला पाहिजे का, या प्रश्नाचे उत्तर शोधताना दी इंडियन एक्स्प्रेसने इंटिग्रेटिव्ह न्युट्रिशनिस्ट पूजा अज्वानी यांच्याशी संवाद साधला. पुजा सांगतात की, मासिक पाळी येण्याच्या एक आठवडा आधी नैसर्गिकरीत्या शरीरातील इन्सुलिनची पातळी वाढते आणि अनेक महिलांना मूडमध्ये काही बदल जाणवतात. कर्बोदके चांगले आणि आनंदी ठेवणारे हार्मोन्स शरीरात सोडतात, जे तुम्हाला तृप्तता जाणवते आणि शांत झोप लागण्यास मदत होते. जर तुम्ही मासिक पाळी येण्याच्या एक आठवडा आधी भात आणि पोळी खाणे बंद केले, तर तुमचा मूड बदलतो आणि भावनिक अस्थिरता येते.



हे सत्य आहे का? मासिक पाळी दरम्यान एक आठवडा आधी शरीराला कर्बोदकांची गरज असते. याबाबत तज्ज्ञदेखील सहमती दर्शवितात. पुण्यातील खराडी येथील मदरहूड हॉस्पिटलच्या सल्लागार, डायटीशिअन व न्युट्रिशनिस्ट वर्षा कृष्णा गाडे यांनी दी इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सांगितले, मासिक पाळीदरम्यान उपवासा करण्याऐवजी संतुलित आहाराची आवश्यकता असते. मासिक पाळीमध्ये उपवास केल्यास तुम्हाला भूक लागू शकते. शरीरातील साखरेची पातळी वाढू शकते आणि तुम्ही गरजेपेक्षा जास्त अन्न खाऊ शकता; ज्यामुळे तुमचे वजन वाढू शकते. तुम्हाला आणखी कर्बोदकेयुक्त आहार खाण्याची इच्छा होऊ शकते. कारण– त्यामुळे तृप्त झाल्यासारखे वाटते आणि शांत झोप लागते.पुढे गाडे यांनी सांगितले, महिलांनी मासिक पाळीदरम्यान उपवास करणे टाळले पाहिजे आणि सर्व आवश्यक पोषक घटक असलेले संतुलित जेवण घेणे आवश्यक आहे. तुमची मासिक पाळी जवळ येत असताना तुम्ही आहारावर प्रयोग करू नका. त्याऐवजी कोशिंबीर, डाळ, चपाती, भाजी आणि थोडासा भात, असा नियमित आहार घ्या.महिलांनी उपवास कधी करावा? बंगळुरू येथील स्पर्श हॉस्पिटलमध्ये सल्लागार प्रसूती आणि स्त्रीरोग, स्त्रीरोग लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया व प्रजनन विशेषज्ञ म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. अनिथा एन. यांनी उपवास कधी करावा याबाबत सांगितले आहे. ०–१४ दिवस : मासिक पाळी चक्राच्या पहिल्या १४ दिवसांमध्ये इस्ट्रोजेनची पातळी वाढते आणि त्यामुळे इन्सुलिनची संवेदनशीलता वाढू शकते. या १४ दिवसांमधील उपवास वजन कमी करण्यासाठी आणि चयापचय आरोग्यासाठी अधिक प्रभावी असू शकतो. १५–२८ दिवस : या दिवसांमध्ये उपवासाची तीव्रता कमी करण्याचा सल्ला दिला जातो. कारण– ओव्ह्युलेशननंतर प्रोजेस्टेरॉनची पातळी वाढते. त्यामुळे भूक आणि इन्सुलिन प्रतिरोध वाढू शकतो. या मासिक पाळीच्या चक्रादरम्यान अधूनमधून उपवास केला जाऊ शकतो, असेही डॉ. अनिथा यांनी सांगितले.मासिक पाळीनुसार उपवास केल्याने ऊर्जेतील चढ–उतार नियंत्रित करण्यात मदत होऊ शकते. डॉ. अनिथा सांगतात की, उपवासामुळे काही महिलांना पोट फुगणे, तणाव व अन्नाची लालसा यांसारख्या प्रीमेन्स्ट्रुअल सिंड्रोम (पीएमएस) लक्षणे नियंत्रित करण्यास मदत मिळू शकते, तसेच अधिक उत्साही आणि शारीरिक व मानसिकदृष्ट्या चांगले कार्य करण्यास मदत करते.

काय लक्षात घ्यावे? लक्षात ठेवा, प्रत्येक स्त्रीचे शरीर भिन्न आहे. त्यामुळे जी बाब एका महिलेसाठी फायदेशीर ठरते, ती दुसऱ्या स्त्रीसाठी फायदेशीर ठरू शकेलच असे नाही.) डॉ. गाडे यांच्या मते, निष्काळजीपणे उपवास केल्याने एखाद्याच्या मनःस्थितीवर व ऊर्जेवरही परिणाम होऊ शकतो आणि मासिक पाळीदरम्यान सुस्ती येऊ शकते. मासिक पाळीच्या वेळी खाण्याच्या चांगल्या सवयी असणे चांगले आहे आणि त्यामुळे तुम्हाला नक्कीच फरक जाणवेल. कारण– खाण्याच्या चांगल्या सवयींमुळे तुमची ऊर्जा पातळी जास्त असेल आणि तुम्हाला सक्रिय वाटेल, असे डॉ. गाडे यांनी स्पष्ट केले.

# पांच वर्षाच्या संघर्षा नंतर सन्मानाने नोकरी मिळाली.

मागीतल्याने मिळत नाही संघर्षा शिवाय पर्याय नाही. हे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी असंघटित समाजाला संघटित करतांना सांगितले होते.तो आदर्श डोळ्या समोर ठेऊन आदरणीय जे.एस.पाटील यांच्या कुशल त्यागी ध्येयनिष्ट नेतृत्वाखाली स्वतंत्र मजदूर युनियन ही क्रांतीकारी आंबेडकरी विचारांची कामगार चळवळ देशपातळीवर संघटित असंघटित कामगारांच्या न्याय हक्क आणि अधिकारासाठी संघर्ष करीत आहे.असाच अनुभव रेल्वेत ठेका मजदूरांना संघटित केले म्हणून संदीप गायकवाड यांना पाच वर्षाच्या संघर्षा नंतर अखेर यश मिळाले.

मी संदीप गायकवाड स्वतंत्र रेल ठेका मजदूर युनियनचा महासचिव गेली ५ वर्षांपासून रेल्वेमध्ये ठेका कामगारांच्या न्यायीक हक्कासाठी संघर्ष करत आलो आहे.अनेक आंदोलन केली.त्यात पुढाकार घेतला म्हणून त्याचा चटका मला संदीप गायकवाड ला बसला होता.तसेच संदीप गायकवाड यांचे मार्गदर्शक आदरणीय संतोष कडाळे साहेब यांनाही डिपार्टमेंटल इन्क्वायरीची लेटर काढून धमकी मिळत होती. तरी पण संदीप गायकवाड यांना एकट्याला त्यांनी सोडलं नाही व संघटनेला एकटे पडू दिले नाही. त्यासाठी हायकोर्टात केसेस केल्या,संदीप गायकवाड यांची नोकरी गेली पण त्यांनी धीर सोडला नाही,या आंबेडकरी विचारांच्या कामगार चळवळीने त्यांना मोठा आधार दिला. आणि संदीप गायकवाड रेल ठेका मजदूरासाठी संघर्ष करत राहीला.

आदरणीय जे.एस. पाटील साहेब यांच्या त्यागाकडे ध्येयाकडे व संघर्षाकडे बघुनच संदीप गायकवाड यांना ऊर्जा मिळत गेली म्हणून मी संदीप गायकवाड आज पुन्हा आमचे प्रेरणास्थान स्वतंत्र मजदूर युनियन चे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय जे.एस.पाटील साहेब व स्वतंत्र रेल्वे बहुजन कर्मचारी युनियनचे माझे मार्गदर्शक,दिशादर्षक मा.संतोष कडाळे साहेब व मा.स्वतंत्र मजदूर युनियनचे महाराष्ट्र अध्यक्ष मा.सागर तायडे साहेब यांच्या अथक प्रयत्नाने स्वतंत्र मजदूर युनियन (आय.एल.यु ) व स्वतंत्र रेल्वे बहुजन कर्मचारी युनियनचे (एस.आर.बी.के.यु.) स्वतंत्र रेल ठेका मजदूर युनियन (एस.आर.टी.एम.यु.) आणि रेल्वे प्रशासन सर्वांच्या मध्यस्थीने आज संदीप गायकवाड ड्युटीवर जॉइन झाले आहेत. काम मिळाले एसी कोच अटेंडेंट सुपरवायजर पदावर पुन्हा ड्युटी करतात.हे फक्त आय एल यु व आदरणीय संतोष कडाळे साहेबांमुळे शक्य झाले,यांनी वारंवार डी आर एम कार्यालयात पुणे मुंबई येथे भेटी दिल्या. रीतसर पत्रव्यवहार करून प्रशासनाला योग्य त्या सुचेना दिल्या.मला संदीप गायकवाड ला स्वतंत्र मजदूर युनियन (आय.एल.यु) ने कधीही एकट पडुन दिलं नाही.कायम स्वतंत्र रेल ठेका मजदूर युनियन (एस.आर.टी.एम.यु.) च्या पाठीशी उभे राहून केसेस चा पाठपुरावा करून हायकोर्टात केसेस चालवल्या,आर्थिक मदत ही केली म्हणून आज मी पुन्हा ऊभा आहे व आजपासून माझी नोकरी पुन्हा मिळाली.स्वतंत्र मजदूर युनियन या आंबेडकरी विचारांच्या कामगार चळवळीची जपवणूक कायमस्वरूपी मी करत राहील.व पुन्हा जोमाने संघटनेचे काम सुरू करेल.सर्वांचे मी मन पूर्वक आभार मानतो.




********

संदीप गायकवाड

महासचिव स्वतंत्र रेल ठेका मजदूर युनियन

# केवळ ११ दिवसात ३५०० मालमत्ताधारकानी घेतला कर सवलतीचा लाभ

## टॅक्स सवलतीच्या मुदतवाढ कालावधीत नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद..

लातूर/प्रतिनिधी :कर संकलन व कर आकारणी विभाग, लातूर शहर महानगरपालिकामार्फत वर्षाच्या सुरुवातीस नियमितपणे कर भरणारे मालमत्ता धारकासाठी विविध सुट/सवलती देण्यात आले आहेत. त्यानुसार ३० जून पर्यंत मालमत्ता कर`पश्रळपश भरणा-यास १० % व ऑफलाइन भरणाऱ्यास ७% सवलत देण्यात आली होती. सदरील योजनेस मालमत्ताधारकांचा मिळणारा उस्फुर्त प्रतिसाद , कर भरणा केंद्रावर होणारी गर्दी व मागणी पहाता विविध सवलती/सुट ला १५ जुलै पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी घेतला आहे. मुदतवाढ कालावधीच्या सुरुवातीच्या ११ दिवसात सुद्धा नागरिकनाचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून ३५०० हून अधिक मालमत्ताधरकांनी सूट चा लाभ घेऊन जवळपास २.५ कोटी चा कर भरणा केलेला आहे तरी दिलेली मुदतवाढ १५ जुलै पर्यंतच असल्याने उर्वरित मालमत्ता धारकाणी त्वरित टॅक्स भरून सूट चा लाभ घ्यावा व सहकार्य करावे असे आव्हान कर संकलन व कर आकारणी विभाग, मनपा लातूर यांच्या वतीने करण्यात येते. कर भरणा करण्यासाठी या वेबसाईटचा वापर करावा . किंवा आपल्या वसुली लिपिक, क्षेत्रीय कार्यालय, व मनपा मुख्यालय येथे आपल्याकडील देय कराचा भरणा करून वरील देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ घेण्यात यावा.

# दीक्षाभूमी येथे झालेल्या आंदोलनातील गुन्हे सरकारने मागे घ्यावेत

## माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

नागपूर पोलीस आयुक्तांना मुख्यमंत्र्यांच्या सूचना आमदार डॉ. नितीन राऊत यांनी आज पुन्हा एकदा भूमिगत पार्किंग विरोधात दीक्षाभूमी येथे घडलेल्या घटनेत दाखल केलेले गुन्हे वापस घेण्याची मागणी केली असता यावर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दखल घेत नागपूर पोलीस आयुक्तांना सूचना केले असल्याचे उत्तर दिले. ज्यामुळे आता गुन्हे दखल झालेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.



मुंबई / प्रतिनिधी :- पवित्र दीक्षाभूमी येथील भूमिगत पार्किंगच्या मुद्द्याला घेऊन १जुलै ला उसळलेल्या गर्दीनंतर नागपूर पोलिसांनी आंदोलकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. दीक्षाभूमीवर झालेल्या आंदोलनानंतर बांधकाम साहित्याची तोडफोड आणि साहित्य जाळपोळ केल्याप्रकरणी नागपूरच्या बजाज नगर पोलिसांनी आंदोलकांवर गुन्हे दाखल केले आहे. आंदोलक गुन्हेगार नाहीत त्यामुळे आंदोलकांवरील गुन्हे सरकारने मागे घ्यावेत, अशी मागणी आज सभागृहात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेना राज्याचे माजी मंत्री आणि नागपूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केली. १जुलै ला दीक्षाभूमी परिसरात झालेल्या घटनेतनंतर बजाजनगर पोलिस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत. यात भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम १२५, १३२, १८९(२), १८९(५),१९०, १९१ (२), २९६, ३२६ (एफ), ३२६(जी) अंतर्गत गुन्हा पोलिसांनी दाखल केले आहे. यावेळी विद्यार्थ्यांवर गुन्हा दखल करण्यात आले होते. हे विद्यार्थी शाळा आणि कॉलेज मध्ये शिकणारे विद्यार्थी असल्याने त्यांचा वरील गुन्हे मागे घेण्यात यावे अशी मागणी यावेळी डॉ. राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना केली. दीक्षाभूमी येथे पार्किंगसाठी खोदलेल्या खड्ड्यामुळे स्तूपाला धोका होईल, बोधिवृक्ष अडचणीत येईल त्यामुळे दीक्षाभूमी येथे भीमसैनिकांनी स्वयंस्फूर्तीने आंदोलन केले होते. आंदोलन करणाऱ्या शेकडो ज्ञात-अज्ञात आंदोलकांवर पोलिसांनी गंभीर प्रकाराचे गुन्हे दाखल केले आहे. प्रकरणी आम्ही आंदोलन करणारे आहोत गुन्हेगार नाहीत. आंदोलकांवरील गुन्हे सरकारने मागे घ्यावेत, अशी मागणी याअगोदर ही डॉ. राऊत यांनी सभागृहात लावून धरली होती.

# आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या संकल्पतनेतुन आणि उपायुक्त डॉ पंजाबराव खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा कर्मचारी यांचे करिता तणाव मुक्ती कार्यशाळा संपन्न






लातूर/प्रतिनिधी :२१ व्या शतकातील जीवनशैलीमुळे, कार्यशैलीमुळे तसेच इतर विविध कारणामुळे मानवाच्या आयुष्यामध्ये ताणतणावाचे अस्तिव निर्माण झाले आहे. ताणतणावामुळे माणसाला त्याची दैनंदिन कामे करणे तसेच जीवनातील जबाबदा-या व्यवस्थीत पणे पार पाडणे यामध्ये खुप अडचणी निर्माण होतात. त्यामुळे शेवटी मनुष्य हतबल होवुन औदासीन्याच्या दरीमध्ये ढकलला जातो. जर हे टाळायचे असेल तर वेळीच ताणतणावाचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्याक असते. त्यामुळे लातुर शहर महानगरपलिकेतर्फे मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या संकल्पतनेतुन आणि उपायुक्त डॉ पंजाबराव खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली मनपातील अधिकारी आणि कर्मचारी यांचे करीता उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन आणि आर्ट ऑफ लिव्हीग यांच्या संयुक्त विद्यमाने - आरोग्य विभागामार्फत तणाव मुक्ती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी उपायुक्त डॉ पंजाबराव खानसोळे तर मार्गदर्शक म्हणुन आर्ट ऑफ लिव्हींगचे लातुर जिल्हा समन्वयक कैलास पाटील आणि आर्ट ऑफ लिव्हींग प्रशिक्षिका डॉ. प्रणिता चाकुरकर यांचे सह महानगरपलिकेतील आधिकारी व कर्मचारी मोठया स ं ख य े न े उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रास्तावीक डॉ ऋषिकेश खरोळकर यांनी केले. त्यानंतर ताणतणाव म्हणजे काय ?, ताणतणाव येण्याचे विविध कारणे काय असतात ?, ताणतणाव आल्यानंतर यांचे आपल्या मनावर आणि आपल्या शरीरावर काय दुष्पपरिणाम होतात ?, आपण तणावात आहोत हे कसे ओळखावे याविषयी प्रशिक्षिका डॉ. प्रणिता चाकुरकर यांनी स्लाईडसचे माध्यमातुन सविस्तर माहिती दिली.

त्यानंतर आर्ट ऑफ लिव्हीग चे लातुर जिल्हा समन्वयक कैलास पाटील यांनी- ताणतणाव टाळण्याकरीता काय काळजी घ्यावी? , ताणतणावाला कसे सामोरे जावे, याविषयी सविस्तर मार्गदर्शन करुन भस्त्रिका प्राणायामव्दारे आपण तणाव कमी करण्याकरीता परिणामकारकरित्या उपाय करु शकतो, हे प्रात्यक्षीकाव्दारे दाखवुन दिले. तणाव कमी करण्याकरीता तसेच निरामय राहण्याकरीता दैनदिन आयुष्यात प्राणायाम आणि योगासने यांचे महत्व त्यांनी स्पष्ट केले. या कार्यशाळेमुळे सर्व आधिकारी व कर्मचारी यांना चांगला उपयोग होईल, तसेच यापुढे मनपा मार्फत राबविण्यामत येणा-या अशा उपक्रमांना सर्व आधिकारी व कर्मचारी यांनी आर्वजुन उपस्थितीत रहावे, असे मत - अध्यक्षीय समारोपामध्ये उपायुक्त डॉ पंजाबराव खानसोळे यांनी व्यक्त केले. तसेच अल्पावधीतच आरोग्य विभागाने सदर कार्यशाळेचे आयोजन करुन उपक्रम यशस्वी केल्यातबद्दल मनपा आरोग्य आधिकारी डॉ शंकर भारती यांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता डॉ रामेश्वर कलवले, शिवकुमार तेली , सुरेंद्र कांबळे , श्रीमती गायत्री कोरे, श्रीमती सारीका सोनके व अतिश सुळ यांनी परिश्रम घेतले. डॉ त्रषिकेश खरोळकर यांच्या आभार प्रर्दशनानंतर कार्यशाळेची सांगता झाली

# पत्नीच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या प्राध्यापक पतीसह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

लातूर : प्रतिनिधी जुळ्या मुली झाल्यामुळे वंशाचा दिवा मुलगा असावा म्हणून सतत पत्नीचा मानसिक आणि शारीरिक छळ करुन पत्नी आजारी पडल्यानंतरही तिच्यावर उपचार न करता तिला तिच्या मरणास कारणीभूत ठरल्याप्रकरणी येथील एका प्राध्यापक पतीसह सासरच्या सहा जणा विरुद्ध अखेर चार महिन्यानंतर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.




नांदेड येथील मुरलीधर वाघमोडे यांची मुलगी ज्योती हिचा विवाह लातूर शहरातील काथवटेनगर नवीन रेनापुर नाका येथील विश्वनाथ उर्फ राजू गंगाधर बुरले यांच्याशी २००३ मध्ये झाला होता. विवाहाच्या काही महिन्यातच विश्वनाथ बुरले यांनी आपली पत्नी ज्योती हिला मानसिक आणि शारीरिक छळ करण्यास सुरुवात केली. माहेरुन पैसे घेऊन ये म्हणून त्रास देणे सुरु झाले. रेणापूर येथील सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालयात प्राध्यापक पदावर काम करणा-या विश्वनाथ बुरले यांनी आपल्याच घरात आपल्या पत्नीचा मानसिक छळ इतका केला की ती स्वत: मरणास तयार झाली पाहिजे. पतीच्या आणि सासरच्या मंडळींच्या छळामुळे ज्योती सतत आजारी पडू लागली. २३ फेब्रुवारी २०२४ रोजी ज्योतीची प्रकृती खालावल्याने तिला लातूर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी भरती करण्यात आले होते. यावेळी पती प्रा. विश्वनाथ बुरले तिला दवाखान्यात भरती करणे ऐवजी तू कुठेही मरून जा असे सांगून निघून गेला होता. परंतु तिची प्रकृती जास्तच खालावल्याने तिने आपल्या दोन्ही भावाला फोन करून सांगितल्यान. तिच्या भावानी लातूर येथे धाव घेऊन तिला हैदराबाद येथील खाजगी रुग्णालयात हलवले होते. त्याची माहिती फिर्यादी भाऊ प्रसाद वाघमोडे याने त्याचा मेव्हणा प्रा. विश्वनाथ बुरले यास दिली. परंतू, प्रा. बुरले याने आजारी पत्नीची एकदाही भेट घेतली नाही. उपचारादरम्यान २० मार्च २०२४ रोजी ज्योतीचा मृत्यू झाला. आपल्या बहिण्याच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या तिचा व सासरच्या मंडळी विरुद्ध मयत ज्योतीचा भाऊ प्रसाद वाघमोडे यांनी लातूर येथील विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन प्रा. विश्वनाथ उर्फ राजू बुरले, ननंद सावित्री हालसे, नंदवई उद्धव हालसे, पुतण्या धनराज बुरले, युवराज बुरले आणि माणिक बुरले यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणातील आरोपीला अद्यापही अटक झाली नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# मुंबई विधानसभेवर संयुक्त संघटनेचा, दखल घेता कि जाता मोर्चा भूमिहीनना न्याय न मिळाल्यास राज्य विधानसभेच्या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकणार - भाई प्रदीप अंभोरे.







मुंबई / प्रतिनिधी :- राज्यभरातील,हजारो बहुजन भूमिहीनाच्या गत २५ वर्षापासून प्रलंबीत महसूल जमीन व १८ वर्षापासून प्रलंबीत वनजमीन प्रश्नावर राज्य शासन व जिल्हा प्रशासानाचे कुंभकर्णी झोपेमुळे केंद्र व शासनाचे जमिन पट्टे बाबत प्रस्तावित निर्णय १९९१ केंद्र शासन आदिवासी वनहक्क निर्णय २००६- ०७ वन जमीन पट्टे भूखंड पट्टे तथा सर्वांसाठी घरे शासन निर्णय २०२२ असतांनाही राज्यातील हजारो हेक्टर जमीनीवाल मागासवर्गीय व गोरगरीब बहुजन भूमिहीन,बेघराना जमीन,भूखंड पट्टे न देता त्यांचे घरावर व जमिनिवर अईन पावसाचे दिवस असताना कारवाई केली जात आहे त्याविरोधात मुंबई विधान सभेवर बहुजन मुक्ती व भूमी मुक्ती मोर्चा महाराष्ट्र संयुक्त संघटना प्रमुख भाई प्रदीप अंभोरे यांचे नेतृत्वात शेकडो भूमिहीनांच्या उपस्थितीत भर पावसात सीएसटी ते आझाद मैदाना वर दखल घेता की जाता मोर्चा काढण्यात आला.मागण्याची राज्यशासन व जिल्हा प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी व दलित अदिवासी वन व महसुल जमीन अतिक्रमीतांना न्याय द्यावा.अन्यथा राज्यातील लाखो भूमिहीनांचा राज्य विधानसभा २०२४ च्या होणाऱ्या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्यात येईल.असा इशारा संघटनेचे भाई प्रदीप अंभोरे यानी आझाद मैदान येथे मोर्चाप्रसंगी शासनास दिला आहे.

मुंबईत झोपड़पट्टी, बुलढाणा,अकोला,जलगांव जिल्हयात वन जमीन व महसुल गायरण जमीनीवर सौर ऊर्जा,पुनर्वसनासाठी बुलडोजर चालवुन जख्मी करूंन बेघर केलं.काहीनां हया घटना पाहून अनेकांना प्राण गमवावे लागले. तर अनेकांनी पेरण्या केल्या नाही. तर काही ठिकाणी शेतातील ऊभे पिक व घर संबंधित प्रशासन बुलडोजरने उद्ध्स्त करण्यास तयार आहे.ह्या शासनास व प्रशासनास अन्याया विरूद्ध जाब विचारण्यासाठी मुंबई विधानसभेवर ८ जुलै २०२४ ला मा.सर्वोच्च न्यायालया च्या २०११ च्या निर्णयानुसार १९९० पुर्वीचे एस.सी.एस.टी चे अतीक्रमण त्वरीत नियमीत करणे बाबत २०२४ मुंबई अधिवेशनात तात्काळ घोषणा करा. राज्यातील लाखो महसुल व गायरान जमिन धारकांच्या आर्थिक उत्थानासाठी मा.सर्वोच न्यायालय निर्णय व राज्य शासनाच्या २०११ च्या निर्णयानुसार मा.मुंबई उच न्यायालय नागपुर खंडपिठा व्दारे केलेल्या आदेशावर राज्य शासनाने मा.सर्वोच न्यायालय व मा.उच न्यायालय मुंबईत दाद मागावी.राज्यातील दलित,अत्याचार,प्रतिबंध,राज्यातील वन व महसुल अतिक्रमण धारकांची पेरणी केलेलं इस.सन २०२३-२४ वर्षा भरात पेरणी केलेले अतिक्रमण धारकांची पिकाची राष्ट्रीय संपत्ती म्हणुन संरक्षण करण्यात यावे. राज्यातील बहुजन शेतकरी, भुमिहीन,प्रकल्पग्रस्त,कामगार शेतमजुरच्या निवासी घराचे कायम पटटे व रमाई घरकुल अनुदान २.५ लक्ष करण्यात यावे. बहुजन भुमीहीनाची अत्यल्प असलेली कर्जा ची १०० टक्के कर्जमुक्ती घोषणा मुंबईत उच्च न्यायालयाच्या आदेशा वरुन व राज्यशासनाच्या निर्णयानुसार मुंबई उच न्यायालयात व नागपुर न्यायालय दाखल केलेल्या प्रलंबित प्रकरणी कार्यवाहीस स्थगीती आदी मागण्याची मुंबई अधिवेशनात घोषणा करा.यासाठी मुंबई विधान सभेवर बहुजन मुक्ती व भूमी मुक्ती मोर्चा महाराष्ट्र संयुक्त संघटना प्रमुख भाई प्रदीप अंभोरे यांचे नेतृत्वात शेकडो भूमिहीनांच्या उपस्थितीत भर पावसात सीएसटी ते आझाद मैदाना वर दखल घेता की जाता मोर्चा काढण्यात आला.मागण्याची राज्यशासन व जिल्हा प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी व दलित अदिवासी वन व महसुल जमीन अतिक्रमीतांना न्याय द्यावा.अन्यथा राज्यातील लाखो भूमिहीनांचा राज्य विधानसभा २०२४ च्या होणाऱ्या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्यात येईल.असा इशारा संघटनेचे भाई प्रदीप अंभोरे यानी आझाद मैदान येथे मोर्चाप्रसंगी शासनास दिला आहे.याप्रसंगी शासनाच्या वतीने मा.मंत्री ना.गुलाबराव पाटील यांच्या निवासस्थानी रमेश गाडेकर,भिमराव खरात, भगवान गवई,रवी उमाळे,प्रकाश वानखेडे,मधुकर मिसाळ या प्रतिनिधीच्या शिस्टमंडळ द्वारे मोर्चाचे निवेदन सादर केले. येत्या १५ दिवसात संबंधित मंत्री महोदयांच्या उपस्थितीत बैठक घेऊ असे आश्र्वासन यावेळी दिले आहें.ज्ञानदेव मिसाळ,राजु काकडे,भरत मुंडे,अशोक सोणारे,इलियास भाई,रोशन वाकोडे, दिपक तायडे,दिलीप गवई, सरांगधर टापरे,सुनील दांडगे,समाधान वाकोडे, कमलबाई वानखेडे,सुमन शिंदे सह महिलाप्रमुख तथा मोर्चाला विदर्भ,मराठवाडा,उत्तर महाराष्ट्र प्रदेश आदिवासी,मागासवर्गीय अल्पसंख्यांक समाजातील प्रातिनिधिक तरुण वयोवृद्ध स्त्री,पुरुष मोठ्या संख्येनं पडत्या पावसात आंदोलन यशस्वी करण्यासाठी सहभागी झाले होते.

# उपसा सिंचन संस्थांच्या थकीत मुद्दल कर्ज माफीचा प्रस्ताव लवकरच सादर होणार

मुंबई : अवसायनात गेलेल्या आणि नोंदणी रद्द झालेल्या सहकारी तत्वावरील उपसा सिंचन योजनांच्या थकीत मुद्दल कर्ज माफीचा प्रस्ताव तयार केला असून तो मंत्रिमंडळासमोर सादरीकरणाची कार्यवाही सुरू आहे, अशी माहिती सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी गुरूवारी (ता. ११ जुलै) विधानसभेत दिली. आमदार माणिकराव कोकाटे यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. या लक्षवेधीवर सहकारमंत्री दिलीप वळसे म्हणाले की, राज्यातील शेतकऱ्यांनी त्यांची शेती सिंचनाखाली आणण्यासाठी सहकारी तत्वावर उपसा सिंचन संस्थांची स्थापना केली आहे. या संस्थाचा प्रकल्प खर्च जास्त प्रमाणात असल्यामुळे लाभधारक सभासदांवरील खर्चाचा भार कमी करुन तो काही प्रमाणात शासनाने उचलावा या उद्देशाने सहकार विभागामार्फत सहकारी उपसा जलसिंचन योजनांना अर्थसहाय्य देण्यात येत असून संस्थांच्या प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के किंवा रुपये एक कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल ती अनुदानाच्या स्वरुपात सहकारी संस्थांना देण्यात येते.

तसेच, राज्यात सध्या एकूण २६५९ नोंदणीकृत सहकारी उपसा जलसिंचन संस्था आहेत. त्यापैकी २१५ उपसा सिंचन सहकारी संस्थांची कर्जाची थकबाकी आहे. या २१५ संस्थांपैकी ९७ संस्था कार्यरत आहेत. तथापि, काही संस्था आर्थिक अडचणीत आल्याने अशा ६७ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली असून ५१ संस्था अवसायनात आहेत. त्याअनुषंगाने राज्यातील अडचणीतील व अवसायनातील तसेच नोंदणी रद्द झालेल्या सहकारी उपसा जलसिंचन संस्थांचे / योजनांचे थकीत कर्ज (मुद्दल) माफ करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला होता, अशी माहिती मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिली.

कुंडलवाडी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., कुंडलवाडी, ता. बिलोली, जि. नांदेड या संस्थेच्या दोन योजनांचे थकीत कर्ज (मुद्दल) आणि श्रीरामकृष्ण गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन संस्था मर्या., ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर या संस्थेच्या चार योजनांचे थकीत कर्ज (मुद्दल) माफ करण्यास आणि हे कर्ज (मुद्दल) रक्कम संबंधित बँकांना शासनामार्फत अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# दोन एकर माळरानावर उभारतेय 'वसुंधरा पार्क'

लातूर : प्रतिनिधी वृक्ष लागवड आणि संवर्धन या कार्यात गेल्या एक दशकापासून कार्यरत असलेल्या वसुंधरा प्रतिष्ठानच्या पुढाकाराने औसा तालुक्यातील तांबरवाडी येथे माळरानावर २ एकर मध्ये 'वसुंधरा पार्क' उभारली जाते आहे. यासाठी युवा शेतक-याने साथ दिली आहे. ११०० विविध पर्यावरण पूरक आणि फळझाडांची लागवड पहिल्या टप्प्यात करुन याचा प्रारंभ करण्यात आला. वसुंधरा प्रतिष्ठानतर्फे गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने वृक्ष लागवड आणि संवर्धन करण्याचे कार्य केले जाते आहे. शाळा, महाविद्यालयात जाऊन तेथील विद्यार्थांना सोबत घेऊन वृक्ष चळवळ अधिक गतिमान केली जाते आहे. लातूर जिल्ह्यात विविध वृक्षांची एक पार्क असावी, जेणेकरुन भविष्यात हे स्थळ पर्यटन स्थळ व्हावे हे ध्येय घेऊन वसुंधरा प्रतिष्ठानच्या पुढाकाराने तांबरवाडी येथे ही पार्क उभारली जाते आहे. या पार्कमध्ये पेरु, आंबा, सीताफळ, जांभूळ, आवळा, चिंच, बदाम या फळझाडांसह बांबू, करंज, चाफा, कडुनिंब, अर्जुन, आयुर्वेदिक वनस्पतीची लागवड केली जात आहे. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शेतकरी दीपक नेलवाडे, सागर पेटकर, उमाकांत पेटकर यांच्यासह वसुंधरा प्रतिष्ठानचे प्रा. योगेश शर्मा, रामेश्वर बावळे, अमोल स्वामी, डॉ. अजित चिखलीकर, राहुल माशाळकर, उमेश ब्याकोडे, वैभव वाघ, विकास धावारे आदींनी पुढाकार घेतला. वसुंधरा प्रतिष्ठान इथे फळझाडे आणि इतर पर्यावरण पूरक झाडांची लागवड करून पार्क उभारत आहे. या उपक्रमासाठी झाडे आणणे, गाडीत भरणे, गाडीतून उपक्रम स्थळी उतरविणे, झाडे लागवड करण्यासाठी खड्डे घेणे ही सगळी कामे वसुंधरा टीम सदस्य गेल्या पंधरा दिवसांपासून सातत्याने करीत आहे. १५ दिवस श्रमदान करुन ११०० खड्डे येथील शेतकरी बांधवांच्या मदतीने घेण्यात आले. काळया आईचे ऋण फेडण्यासाठी आणि वसुंधरेचे रक्षण करण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत प्रामाणिकपणे कार्य करीत राहू असा निर्धार वसुंधरा टीमने केला आहे. दिवसेंदिवस झाडांची संख्या कमी होत चालल्याने शुद्ध हवा मिळत नाही. यामुळे अनेक आरोग्य विषयक समस्या निर्माण होत आहेत. कडुनिंब हे झाड आयुर्वेदिक असून ऑक्सिजन जास्त प्रमाणात देते. यासाठी वसुंधरा प्रतिष्ठानच्या पुढाकाराने लातूर तालुक्यातील एकुर्गा गावात श्रीकांत इंगळे पाटील यांच्या शेत बंधा-यावर ३०० कडुनिंबाची लागवड करून ऑक्सिजन पार्क उभारला. लातूर जिल्ह्याची शुद्ध हवेची गरज ओळखून अनेक ठिकाणी असे ऑक्सिजन पार्क उभारण्याचा संकल्प केला आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE